

रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

ता. पलूस, जि. सांगली



## मराठी विभाग २०२२-२३

**‘मुद्रितशोधन कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम’**

**(Certificate Course in Proof Reading)**

## अहवाल (REPORT)

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात बी.ए. भाग ३ (मराठी) विषयाला प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी **‘मुद्रितशोधन कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम’ (Certificate Course in Proof Reading)** या प्रमाणपत्र कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.टी.एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास मंडळ स्थापन करण्यात आले. अभ्यास मंडळाकडून प्रथमत: अभ्यासक्रमाची आखणी तयार करण्यात आली. त्यानुसार विभागाच्या वतीने अभ्यासक्रमासाठी दि. ०१ फेब्रुवारी, २०२३ ते २९ एप्रिल, २०२३ असा तीन महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला. नियमित कोर्सची व्याख्याने घेण्यात आली.

मराठी भाषेत लेखन करताना महत्वाचा घटक म्हणजे मजकुराची शुद्धता सांभाळणे.लिखित मजकुराच्या व्याकरण शुद्धते बरोबर आशयाचे अचूक संपादनही तितकेच महत्वाचे असते. ओंत्याही मजकुराच्या आशय शुद्धतेची व अचूकतेची जबाबदारी लेखकाची असली तरी व्याकरणदृष्ट्या लेखन निर्दोष करणे आवश्यक असते.यातून मुद्रित शोदानाची गरज स्पष्ट होते. त्यामुळे भविष्यातील रोजगाराची संधी म्हणून विद्यार्थ्यांनी या माध्यमांकडे पाहवे, या हेतूने सदर प्रमाणपत्र कोर्सचे आयोजन मराठी विभागाच्या वतीने करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना मुद्रित शोधनाविषयी प्राथमिक माहिती देण्याचा उद्देश यामागे होता.

नियमित या अभ्यासक्रमांच्या व्याख्यानांचे आयोजन केले. गेस्ट लेक्चरर म्हणून क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड कॉलेजचे प्रा.डॉ.नवनाथ गुंड, यांना आमंत्रित केले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष मुद्रितशोधन लेखनाचा सराव करून घेतला. मुद्रितशोधन करताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर केल्या.

सदर प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर शेवटी शुक्रवार, दि. १२ मे, २०२३ रोजी लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा देखील याच दिवशी घेण्यात आली. त्यानुसार या अभ्यासक्रमासाठी एकूण १० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. सदरचे सर्व विद्यार्थी हे बी.ए. भाग ३ (मराठी) वर्गातील होते. प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी **‘मुद्रितशोधन कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम’** यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांना विभागाकडून प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

महाविद्यालयाचे मा. प्र. प्राचार्य डॉ.टी.एस. भोसले यांनी हा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण व्हावा यासाठी विशेष मार्गदर्शन केले. प्रोत्साहन दिले. तसेच मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने यांनी मार्गदर्शनाबरोबर तासिका घेऊन मौलिक योगदान दिले. माझे सहकारी प्रा. स्वाती मगदूम यांनीही तासिका घेऊन सहकार्य केले. सदर कोर्स व्यवस्थितरित्या पूर्ण होण्यासाठी महाविद्यालयाचे ग्रंथपाल आणि ग्रंथालय परिचर यांनी स्रोत ग्रंथांची उपलब्धता करून दिली, त्याबद्दल मी त्यांचेही मन:पूर्वक ऋण व्यक्त करते. आणि मला सदर प्रशिक्षण वर्गाचा समन्वयक होण्याची संधी दिली त्याबद्दल मी विभागप्रमुख व प्राचार्य यांचे आभार मानते.

समन्वयक (डॉ.तेजस चव्हाण ) | विभागप्रमुख | प्राचार्य